# अमर्त्य सेन एक बुद्धिप्रामाण्यवादी संवेदनशील अर्थतज्ञ

– डॉ. प्रतिमा बाळासाहेब कदम

## जीवन चरित्र –

३ नोव्हेंबर १९३३ रोजी अमर्त्य सेन यांचा जन्म शांतीनिकेतन येथे एका सुशिक्षित आणि सुसंस्कृत कुटुंबात झाला. सुसंस्कृत व सर्जनशील वातावरणात ते लहानाचे मोठे झाले. अमर्त्य सेन यांचे वडील आशुतोष सेन हे विज्ञान क्षेत्रात काम करत होते. ते ढाक्का विद्यापीठात रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. तर सेन यांची आई अमिता सेन या बंगालमधील एका ललित नियतकालीकाच्या संपादिका होत्या. अमर्त्य सेन यांचे ढाक्का येथील सेंट ग्रेगरी स्कूलमध्ये सुरुवातीचे शिक्षण झाले व पुढे त्यांनी विश्वभारतीत इंटरपर्यंतचे शिक्षण घेतले आणि १९५३ मध्ये कोलकात्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून अर्थशास्त्र हा विषय घेऊन त्यांनी बी.ए. पदवी मिळवली. त्यानंतर ते इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी गेले व एम.ए. आणि डॉक्टरेट ह्या पदव्या प्राप्त केल्या. अवघ्या २३ व्या वर्षी सेन जादवपूर विद्यापीठात प्राध्यापक पदावर रुजू झाले. त्यांनी १९५५–५८ मध्ये जादवपूर विद्यापीठ व १९६३–७१ मध्ये दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे अध्यापन केले व नंतर १९७१ – ७७ मध्ये इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि १९७७–८८ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठात त्यांनी अध्यापन केले. त्यानंतर १९८० ते ८७ मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठातच त्यांनी राजकीय अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणूनही काम केले.

अमर्त्य सेन यांनी अर्थशास्त्राबरोबरच तत्वज्ञान विषयाचा अभ्यास केला. त्यांनी १९८८–९८ या काळात अमेरिकेतील हार्व्हर्ड विद्यापीठात अर्थशास्त्र आणि तत्वज्ञान या विषयांचे अध्यापन केले. १९९८–२००४ मध्ये 'मास्टर ऑफ ट्रिनिटी कॉलेज' या पदावर त्यांची नियुक्ती झाली. या पदावर काम करणारे ते पहिले भारतीय होते. त्यानंतर हार्व्हर्ड येथे लॅमाँट युनिव्हर्सिटीत 'प्रोफेसर' म्हणून त्यांनी काम केले. १९९६ मध्ये अमर्त्य सेन यांना अमेरिकन इकॉनॉमिक असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. विशेष बाब इथे अधोरेखित करावी वाटते ती म्हणजे सेन हे अमेरिकेचे नागरिक नसून सुद्धा त्यांच्या कर्तुत्वाची व कार्याची अमेरिकन इकॉनॉमिक असोसिएशनने दखल घेऊन हा बहुमान त्यांना प्रदान केला. अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना हे माहीतच आहे कि अमर्त्य सेन यांना जागतिक कीर्तीचे मानवतावादी बुद्धिप्रामाण्यवादी भारतीय अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले जाते. त्यांनी कल्याणकारी अर्थशास्त्र, सामाजिक

निवडीचा सिद्धांत, तसेच दारिद्र्याच्या प्रश्नावर केलेल्या संशोधनाबद्दल त्यांना १९९८ मध्ये जगातला सर्वात मानाचा म्हणजे अर्थशास्त्रातला नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**अमर्त्य सेन यांचे कार्य –**

अमर्त्य सेन हे जागतिक कीर्तीचे मानवतावादी, बुद्धिप्रामाण्यवादी भारतीय अर्थशास्त्रज्ञ आहेत हि सर्व भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. अमर्त्य सेन हे १९९८ मध्ये अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. अमर्त्य सेन यांनी विशेषतः कल्याणकारी अर्थशास्त्रातील मुलभूत समस्यांवर उपाय शोधण्यासाठी अर्थशास्त्रात अत्यंत महत्त्वाचे योगदान दिले आहे. अमर्त्य सेन यांना कल्याणाच्या अर्थशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते. कल्याणकारी अर्थशास्त्राचे मुख्य उद्दिष्ट अर्थशास्त्रीय धोरणांचे समाजाच्या हितावर काय परिणाम होतात तसेच अर्थशास्त्रीय धोरणांचे मूल्यमापन योग्य पद्धतीने करणे हे आहे. कल्याणाच्या अर्थशास्त्रामध्ये मुलभूत समस्यांचे संशोधन करण्यामध्ये अमर्त्य सेन यांचे मोलाचे योगदान आहे. अमर्त्य सेन यांच्या संशोधनाचा आवाका खूप मोठा आहे. सामाजिक निवडीचा सिद्धांत, कल्याणाची व्याख्या, दारिद्र्याचे निर्देशांक तसेच दुष्काळाच्या परिस्थितीचा अनुभवनिष्ठ अभ्यास अशी सेन यांच्या संशोधनाची व्याप्ती आहे. हे सगळे आर्थिक घटक वितरणाच्या प्रश्नाच्या माध्यमाने व समाजातील दुर्बल घटकांच्या समस्येचे निराकरण करण्याच्या दृष्टीकोनातून एकमेकांशी निगडीत आहेत. एखादा सामुहिक निर्णय घेतल्यानंतर वेगवेगळ्या व्यक्तींच्या कल्याणावर त्याचा कसा परिणाम होतो याचे विश्लेषण सेन यांनी त्यांच्या अभ्यासात केले आहे. अमर्त्य सेन यांनी दारिद्र्य निर्देशांक अधिक समाधानकारक व नव्या व्याख्यासहित स्पष्ट केले आहेत. दुष्काळाच्या परिस्थितीत आर्थिक यंत्रणा कशाप्रकारे कार्य करते हे सेन यांनी अनुभवनिष्ठ अभ्यासाच्या आधारे सैद्धांतिक दृष्टीकोन प्रत्यक्ष परिस्थितीत लागू करून मग तो स्पष्ट करून दाखवला आहे. उपलब्ध असलेल्या पर्यायांना समाजातील व्यक्ती जी मूल्य लावतात ती मूल्य संपूर्ण समाजाची मुल्य ठरवताना उपयोगी येतात का? उत्पन्नाच्या विषमतेचे मापन कोणत्या पद्धतीने व्हायला पाहिजे? समाजातील वेगवेगळ्या स्तरावर कल्याणाची विभागणी कधी आणि कशा पद्धतीने व्हायला हवी? दुष्काळाला कारणीभूत नेमके कोणते घटक आहेत ? अश्या अनेक प्रश्नांची उत्तरे अमर्त्य सेन यांनी आपल्या संशोधनातून देऊन अर्थशास्त्राचा मूळ गाभा असलेल्या क्षेत्रात अभूतपर्व कामगिरी केली आहे. अमर्त्य सेन यांनी मुलभूत आर्थिक प्रश्नांच्या चर्चेत अर्थशास्त्र व तत्वज्ञान यातील उपलब्ध साधनाची योग्य सांगड घालून नितीमत्ता हि बाजू अर्थशास्त्रात पुनर्स्थापित केली.

अमर्त्य सेन यांनी आपल्या अभ्यासात समाजात अस्तित्वात असलेल्या प्रश्नांपैकी दारिद्याचे व कल्याणाचे निर्देशांक असे दोन निर्देशांक निश्चित केले

आहेत. या निर्देशांकाचा वापर देशात अस्तित्वात असलेल्या अत्यंत भयंकर प्रश्नांवर उपाय सुचविण्यासाठी करण्यात आलेला आहे जसे कि, या निर्देशांकाचा वापर देशातल्या वेगवेगळ्या समाजगटांमध्ये दारिद्याचे प्रमाण किती आहे ? त्याचे विभाजन कसे आहे? त्यामध्ये वेळोवेळी कसे आणि कोणते बदल झाले आहेत? याचा अभ्यास करण्यासाठी होतो त्याबरोबरच देशातले दारिद्र्याचे प्रमाण आणि आर्थिक कल्याणाचे प्रमाण यांच्यातील तुलना करण्यासाठीसुद्धा सेन यांनी निश्चित केलेले दारिद्याचे व कल्याणाचे निर्देशांक महत्त्वाचे आहेत. त्यानंतर १९९० मध्ये 'युनायटेड नेशन्स ह्यूमन इंडेक्स' ही प्रणाली अमर्त्य सेन यांनी विकसित केली. हि प्रणाली देशांची क्रमवारी ठरविण्यासाठी तेथील लोकांचे आयुर्मान, शिक्षण व उत्पन्न यावर आधारित होती. दुष्काळ आणि गरिबी यातील परस्परसंबंध शोधण्यासाठी संशोधन करताना अमर्त्य सेन यांनी १९८१ साली लिहिलेल्या आपल्या 'एन्टायटलमेंट अँड डिप्रायव्हेशन' या शोधनिबंधात मांडलेला महत्वाचा निष्कर्ष असा होता कि, भुकेचा प्रश्न निर्माण होण्यामागे धान्यटंचाई हे कारण नसून असमानतेने ग्रासलेली वितरणव्यवस्था हे मुख्य कारण आहे. गरिबीचा व असमान वितरणाचा हा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी काही कल्पना मांडल्या आहेत. शहरांमधून निर्माण झालेली आर्थिक तेजी आणि त्यामुळे वाढलेल्या अन्नधान्याच्या किंमती यांमुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ शकते असे अमर्त्य सेन यांनी मत मांडले होते. याला उपाय म्हणून अन्नधान्य उत्पादन व पुरवठाविषयक सरकारी धोरणांमध्ये काही बदल करून किमान प्रयत्नांच्या माध्यमातून आपल्या देशातून भूक आणि अपुरा आहार या दोन्ही मुख्य समस्या हद्दपार करता येतील. दारिद्र्य, अन्याय, कुपोषणामुळे उद्भवणारे आजार किंवा अज्ञानामुळे निर्माण होणारे प्रश्न वाढवणारे दुष्टचक्र रोखता येईल असे सेन यांचे मत आहे. याचे उदाहरण म्हणजे, १९४३ च्या बंगालच्या दुष्काळाने सेन यांना जगातील असमानतेविषयी तीव्रता जाणवली. वयाच्या नवव्या वर्षी त्यांनी दुष्काळ प्रत्यक्ष पाहिला होता. या घटनेचा पडसाद त्यांच्या बाल मनावर पडला. या १९४३ च्या दुष्काळामध्ये उपासमारीमुळे लाखो लोक मरण पावले होते. भूमिहीन, मजूर इ. वर्गातील जनता हि देशातील अन्नधान्याच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे ते विकत घेऊ शकत नाहीत म्हणून मृत्युमुखी पडले होते. परंतु अमर्त्य सेन यांनी पुढे आपल्या अभ्यासात माहितीच्या आधारे असे म्हटले आहे कि, बंगालमध्ये अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला म्हणून अन्नधान्याच्या किंमती वाढल्या असे नसून धान्याच्या झालेल्या साठेबाजीमुळे अन्नधान्य महाग झाले होते. त्यामुळे ते लोकांना खरेदी करता येणे अशक्यप्राय झाले आणि त्यामुळे लोकांची उपासमार झाली. आपल्या अभ्यासातून अमर्त्य सेन यांनी सर्व जागतिक अर्थव्यवस्थेला 'गरिबांना धान्य विकत घेणे परवडेल, याची सोय करा' हा संदेश दिला आहे. हा त्यांचा संदेश अत्यंत

मौलिक होता. त्याचा संयुक्त राष्ट्रसंघापासून ते अनेक देशांच्या राज्यांच्या धोरणांवर त्याचा प्रभाव जाणवतो.

अमर्त्य सेन यांचे अर्थशास्त्रातील संशोधन प्रमुख सहा घटकांवर झालेले दिसते. या त्यांच्या संपूर्ण संशोधनातून सेन यांची बुद्धिवादी परंपरा स्पष्ट होते. अमर्त्य सेन यांनी आपल्या अभ्यासात विकासाच्या अर्थशास्त्रासाठी व्यष्टी अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडला. भांडवल सिद्धांत व विकास यातील परस्परसंबंधाचा अभ्यास केला. सामाजिक निकड यातील त्यांचे कार्य अतिशय महत्वाकांक्षी होते. कल्याणाचे वाटप, उत्पन्न विषमता या बाबतीत सेन यांनी असे स्पष्टीकरण दिले कि, समाजाच्या कल्याणाची तुलना करताना दरडोई उत्पन्न निर्देशांक फक्त सरासरी दाखवतो. त्यामुळे कल्याणाचे व दारिद्र्याचे मापन करण्यासाठी अमर्त्य सेन यांनी पर्यायी निर्देशांक विकसित केले. वंचितता, विषमता, नितीमत्ता आणि व्यक्तीची क्षमता या मानवी जीवनाशी निगडीत असणाऱ्या प्रश्नाचे विश्लेषण अमर्त्य सेन यांनी आपल्या अभ्यासातून केले आहे. अर्थव्यवस्थेत मानवी जीवनाशी संबंधित असलेल्या सर्व प्रश्नांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने वृत्तपत्र व लोकशाही व्यवस्था महत्वाची भूमिका पार पाडू शकते असे सेन यांनी आपल्या अभ्यासात विश्लेषण केले आहे. थोडक्यात, अमर्त्य सेन यांनी आपल्या अभ्यासात अर्थशास्त्र व मानवतावाद यांची सांगड घातली आहे.

**संदर्भ –**


१) डॉ. विनायक देशपांडे डॉ. श्री. आ. देशपांडे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक विजेते,

२) इंगळे, व. न. नोबेल भूषण अमर्त्य सेन, औरंगाबाद, २०१०.

३) देऊळगावकर, अतुल, विवेकीयांची संगती, पुणे, २०१९.

४) जाधव, अर्जुन, अमर्त्य सेन : अर्थशास्त्राचा मानवी चेहरा, सातारा.

५) कहाते अतुल, सुपरहिरो अमर्त्य सेन , पुणे.

६) सक्सेना, रीचा, अमर्त्य सेन : जीवन चरित्र, पुणे.

७) Beyer, G. J. (2014). Poverty, Freedom, and Solidarity in the Thought of Amartya Sen. In G. J. Beyer, Poverty, Freedom, and Solidarity in the Thought of Amartya Sen (pp. 135-156).

८) Bhardwaj, Aparna; Thakur, Anil Kumar, Amartya Sen Human development, ¦elhi, 2012.

९) Dua Shyam, Luminous Life of Amartya Sen Illustrated Biography, Delhi, 2004.

१०) www.google.com.